Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-9 | March-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# *ज्ञानदेवे रचिला पाया ......*

***व्यंकटेश पोटफोडे***

श्रीमती राजकमल बा. तिडके महाविदयालय, मौदा जि. नागपूर.

***सारांश :-*** जगामध्ये हिंदू, मुस्लिम, शीख, ईसाई, बौध्द, ख्रिश्चन असे महत्वाचे धर्म मानले जातात. प्रत्येक धर्माचे एक किंवा त्यापेक्षा जास्त धर्मग्रंथ मानले जातात. तीच त्या धर्माची आचारसंहिता असते. हिंदू धर्मामध्ये रामायण, महाभारत, वेद, उपनिषदे, ख्रिश्चनधर्मामध्ये बायबल, बौध्दधर्मात त्रिपिटक, मुस्लिमधर्मामध्ये कुराण, शीखधर्मामध्ये गुरूग्रंथसाहेब यांना अत्यंत पवित्र व मानाचे स्थान आहे. हिंदू धर्मामध्ये भगवतगीता हा ग्रंथ पवित्र व आदरणीय मानला जातो. प्रत्यक्ष श्रीकृष्णाने अर्जुनाला रणांगणावर केलेला उपदेश म्हणजे भगवतगीता होय. अत्यंत प्राचीन काळापासून भगवतगीता ही जिव्हाळ्याचा विषय आहे. मुळात भगवतगीता संस्कृत भाषेत आहे.त्यावर ज्ञानेश्वर – एकनाथापासून लोकमान्य टिळक, स्वामी स्वरूपानंद, म.गांधी, विनोबा भावे आणि आजतागायत कितीतरी भाष्यकार टीका रचना लिहित आहेत, अभ्यास करीत आहेत. भगवतगीतेमध्ये 18 अध्याय असून 700 श्लोक आहेत. या 700 श्लोकांवर संत ज्ञानेश्वरांनी 18 अध्यायात 9,000 ओव्या रचल्या आहेत. संत ज्ञानेश्वरांनी भगवतगीतेच्या प्रत्यक्ष अनुवादापूर्वी 84 ओव्यांमधून ज्ञानेश्वरीचे प्रयोजन, गुरूस्तवन वर्णन केले आहे.

## *प्रस्तावना*

ओम नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।1।।

अशा ओवीने ज्ञानेश्वरीची सुरूवात असून ओमकाराला नमन केले आहे. संत ज्ञानेश्वरांनी अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हरिपाठाचे अभंग, विराण्या, गौळणी लिहिल्या. संत ज्ञानेश्वरांची वंशपरंपरा ही हरीहरपंत ⟶ रामचंद्रपंत ⟶ गोपाळपंत त्र्यंबकपंत⟶ गोविंदपंत विठ्ठलपंत अशी आहे. विठ्ठलपंत⟶ आणि आळंदी येथील सिधोपंत कुलकर्णी यांची कन्या रूक्मिणी यांना निवृत्तीनाथ (जन्म शके 1195) , ज्ञानेश्वर (जन्म शके 1196), सोपानदेव (जन्म शके 1199), मुक्ताबाई (जन्म शके 1209), ही चार अपत्येझालीत. संत ज्ञानेश्वराच्या कुटुंबामध्ये पंढरपूरची वारी केली जात होती. ते परंपरेने वैष्णव पंथीय आहेत.संत ज्ञानेश्वराची गुरूपरंपराआदिनाथमत्सेंद्रनाथगोरक्षनाथगहिनीनाथ ⟶ निवृत्तीनाथ अशी आहे.

वडील बंधू निवृत्तीनाथांना संत ज्ञानेश्वरांनी गुरू मानले. निवृत्तीनाथाची गुरूपरंपरा पाहिली असता हे सर्व शीवाचे, शंकराचे उपासक होते. दोन्ही उपासनापंथाला एकवटण्याचे कार्य संत ज्ञानेश्वरांनी केले.

'' उभेच्या भ्रतारा भंजावे नि त्यानि ।
हरीचे कीर्तनी जात जावे ।। ''

ज्ञानेश्वरीमध्ये वैष्णव, शीव यांच्या उपासनेबद्दलचा उपदेश केला आहे. यातून ज्ञानेश्वराची समन्वयवादी दृष्टी दिसते.वंश आणि गुरूपरंपरेचा प्रभाव ज्ञानेश्वरांवर असला तरी उत्कृष्ठ अशा स्वरूपाच्या ग्रंथाची निर्मिती झाल्यामुळे ज्ञानेश्वरीचे हिंदी, गुजराती, कन्नडी, बंगाली, तेलगू, ओडिसा इत्यादी भाषांमध्ये भाषांतरे झाली. मुळ ज्ञानेश्वरी मराठी भाषेतील आहे. भगवतगीतेवर विविध दृष्टीकोनातून टीका असल्यामुळे संत ज्ञानेश्वर तिला 'भावार्थदीपिका', 'यथार्थदीपिका' असे म्हणतात. ज्ञानेश्वरीतून भगवतगीतेचा भावार्थ व्यक्त होतो. भगवतगीतेचा संपूर्ण आशय ज्ञानेश्वरीत आलेला आहे. भगवतगीतेतील प्रत्येक श्लोकावर टीका नसून

आशयाला महत्त्व आहे. संत ज्ञानेश्वरांच्या मनामध्ये मराठी भाषेबद्दलचा आदर आहे.

माझा मऱ्हाठाची बोलू कौतुकें । परि अमृतातेंहि पैजा जिंके
ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।।

हा आत्मानुभव, आत्मविश्वास ज्ञानेश्वर व्यक्त करतात. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली नसती तर पंडीताच्या कपाटात बंदिस्त असणारी भगवतगीता प्राकृतात, मराठीत अवतरली नसती.

ईये मराठाचिये नगरी।ब्रम्हविदयेचा सुकाळ करी।।
घेणे देणे सुखची करी।होवू देई या जगा ।।

सर्वसामान्य, भोळया–भाबळया , स्त्री–पुरूषापर्यंत, रावापासून रंकापर्यत ब्रम्हज्ञान पोहचविण्यासाठी, मानवी जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी ज्ञानेश्वरी हा महत्वपूर्ण ग्रंथ आहे. ज्ञानेश्वरीचे मोठेपण संत नामदेवांनी ओळखल्यामुळे "एक तरी ओवी अनुभवावी" अशा स्वरूपाचे प्रमाणपत्र त्यांनी दिले आहे. ज्ञानेश्वरीमध्ये तत्वज्ञान, काव्य, आत्मानुभूति आहे. ज्ञानेश्वरी अत्यंत सुबोध, रसाळ,सुंदर असल्याचे भाष्यकार प्रमाणपत्र देतात. त्यामुळे संत ज्ञानेश्वर हे श्रेष्ठ भाष्यकार ठरतात. संत ज्ञानेश्वर हे कवी, योगी, तत्वज्ञही असून त्यांची संताची भूमिका महत्वपूर्ण आहे. ज्ञानदेवांनी स्थापन केलेला वारकरी संप्रदाय हा त्यांचाच विचारावर आधरीत असून यामध्ये सत्संगाला अधिक महत्व आहे. संत तुकाराम म्हणतात की.....

करिता देर्वाचन। घरा आले संतजन।।
देव सारावे परते। संत पुजावे आरते।।

संत कबीरांनी देवापेक्षाही गुरूला मोठेपण बहाल केले तर संत तुकारामांनी संताना श्रेष्ठ मानले आहे. संतांची संगती घडल्याने नेहमी कानावर सृजनात्मक वाक्य येत असतात. हा संगतीचा परिणाम कुणालाही मान्य होईल.

गुरू, ईश्वर, यांना वारकरी संप्रदायामध्ये सर्वोच्च स्थान मिळाले आहे. गुरूस्तवन करतांना संत ज्ञानदेव म्हणतात की.....

' मज हृदयी सदगुरू। जेणे तारिलो हा संसारपूरू ।
म्हणऊनि विशेषें अत्पादरू। विवेकावरी ।।
जैसें डोळ्या अंजन भेटे। ते वेळीं दृष्टिस फांटा फुटे ।
मग वास पाहिजे तेथ प्रगटे। महानिधी
कां चिंतामणी जालया हाती। सदा विजयवृत्ती मनोरथी ।
तैसा मी पूर्ण काम निवृत्ती। ज्ञानदेव म्हणे।।

योगी, वडील बंधू, तत्त्वज्ञ निवृत्तीनाथ हे ज्ञानदेवाचे गुरू होते. ते ज्ञानदेवाच्या जीवनाचा आधार बनले. वडीलाच्या मृत्यूनंतर संपूर्ण जबाबदारी निवृत्तीनाथांनी सांभाळली होती. गुरू हा स्फुलिंगासारखा ओळखणारा असतो. चुकत असणाऱ्या शिष्याला मार्गदर्शन करणारा असतो. गुरू हा आपल्या शिष्यातील सद्गुण व दुर्गूण ओळखतो. त्याच्यातील विधायक जाणत असल्यामुळे शिष्याच्या बुध्दितील विवेकाची वाढ करीतो. ज्ञानेश्वरीमध्ये उत्तम गुरू निवृत्तीनाथ व उत्तम शिष्य ज्ञानदेव ही जोडी शोभून दिसते. सांसारिक जीवनातील भावा भावांचे नाते बाजूला होऊन शिष्य गुरूबद्दलचा आदरभाव विविध ओव्यांमधून जपला आहे. निवृत्तीनाथामुळे अज्ञान, अविज्ञेचा अंधार नाहीसा झाला आहे.

संत ज्ञानेश्वरांची गुरूभक्ती, ज्ञानेश्वरी, हरिपाठाचे अभंग, चांगदेवपासष्टी, विराण्या, यातील वारंवर येणाऱ्या उल्लेखातून व्यक्त होते. संत कबीर आपल्या एका दोह्यात म्हणतात की.....

गुरू गोविंद दोऊ खडे है, काके लागौ पाय।
बलिहारी गुरू आपणे गोविंद दियौ बनाय।।

संत ज्ञानेश्वरांच्या मनामध्ये गुरूबद्दलचा असणारा जिव्हाळा, स्नेह, प्रेम, आदरभाव त्यांच्या साहित्यामधून व्यक्त होतो.

गुरू हा संत कुळींचा राजा। गुरू हा प्राणविसावा माझा
गुरूविण देव दूजा। पाहता नाही त्रिलोकी।।
गुरू हा सुखाचा सागरू। गुरू हा प्रेमाचा आगरू।
गुरू धैर्याचा डोंगरू। कदाकाळी डळमळे ना।।
गुरू वैराग्याचं मुळ। गुरू हा परब्रम्ह केवळ।।
गुरू सोडवी तत्काळ। गाठ लिंगभेदाची ।।

श्रोता व वक्ता हृदयसंवाद साधतांना श्रोत्याबद्दलचा ज्ञानदेवाच्या मनातील जिव्हाळा प्रकट होतो. वक्ता कितीही श्रेष्ठ असला तरी श्रोत्यांवर त्याचे मोल अवलंबून असते. "श्रोते विन वक्ता , वक्ता नव्हे" असे म्हटले जाते. ज्ञानदेवांनी आपल्या श्रोत्याला चकोर पक्षाची उपमा दिली आहे. साहित्यदृष्ट्या अत्यंत श्रेष्ठ असे शब्दालंकार, उपमा, उत्प्रेक्षा त्यांनी वापरल्या आहेत.

"जैसे शारदियेचे चंद्रकळे।माजी अमृतकण कोंवळे ।।
ते वेचिती मने मवाळें। चकोरतलगे।।
तियापरी श्रोता। अनुभवावी ही कथा।
अति हळुवार चित्ता। आणुनियां।। ''

संत ज्ञानेश्वर श्रोत्यांना सृजन मानतात. त्यांना आपल्या भावना, विचार श्रोत्यापर्यंत पोहचविणे अत्यंत महत्वाचे वाटते. त्यामुळे "हे हृदयची ते हृदयी" जाण्यासाठी श्रोत्यांचे अवधान आवश्यक वाटते. श्रोत्यांना त्यांनी श्रीमंत माहेर, सुखअमृताचे डोह, प्रसन्नतेचे मळे मानले आहे.

संत ज्ञानदेवामध्ये समभाववृत्ती असल्यामुळे वारकरी संप्रदायामध्ये बहुजन समाजाचा मेळा जमलेला आहे. ज्ञानदेवाचा वारसा संत नामदेव, गोरा कुंभार, सेना न्हावी, सावता माळी, नरहरी सोनार, संत तुकाराम, रामदास स्वामी, एकनाथ अशा संतानी चालविला आहे. हे सर्व वारकरी संत विविध जातीमधून आलेले आहेत. सर्वांनी जातीयतेचे कवच बाजूला सारून वारकरी पंथाचा झेंडा खांद्यावर घेतला. वारकरी संप्रदायील मुक्ताईचा वारसा जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई, सखूबाई, वेणाबाई, प्रेमाबाई, राकाबाई यांनी पुढे चालविला. वारकरी संप्रदायामध्ये, त्यांच्या दिंडी, प्रवचन यामध्ये संपूर्ण देशभरातून अठरापगड जातीधर्माचे भाविक सहभागी होतात. त्यांच्यात जात, पंथ, लिंग, उच्चनीच असा भेदभाव दिसून येत नाही. त्यांच्यामध्ये असणारी समानतेची शिकवण ज्ञानेश्वरापासून आली आहे. ज्ञानेश्वरीत तसाच विचार आहे. भूमी उत्तमाचा स्वीकार व वाईटचा त्याग करणे ओळखत नाही. पाणी तहानभागवितांना गरीब, श्रीमंत, भिकारी, राजा, पशू, पक्षी, मानव असा भेद करीत नाही. दिवा सर्वांना समान प्रकाश देतो. वृक्ष सर्वांना समान फळाची रूची देतात, सावली देतात त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरीमधून समान ब्रम्हरसाचा प्रसाद मिळतो. संत ज्ञानेश्वरानी बालपणापासून संघर्ष केला व त्यांना दुःखाची जाणीव आहे हे ज्ञानेश्वरीतून डोकावित नाही. एकूणच ज्ञानेश्वराचे जीवन कार्य भक्तांना, वाचकांचा दिशादर्शक आहे. ज्ञानेश्वर योगी चांगदेवाला 65 ओव्यामधून वेदांताचा गाभा उलघडून दाखवितात तसेच महाराष्ट्रातील भोळया जनतेला साध्या, सोप्या, सरळ भाषेत गीतेतील जीवनाचे तत्त्वज्ञान सांगतात. ज्ञानदेवांच्या विराण्या, गौळणी अपूर्व आनंद देतात.

'ओम नमो जी आदया' अशी ज्ञानेश्वरीची सुरूवात आहे. ज्ञानेश्वर परमेश्वराला ओंकार स्वरूपात मानणारे आहेत. ज्ञानदेव स्वतःच प्रश्न निर्माण करून त्याचे उत्तरही देतात. हे प्रश्न भक्तांच्या मनातील व्दंद संपविणारे आहे. त्यातून समन्वय साधणारे आहेत. ' तुज सगुण म्हणो की, निर्गुण रे ' या प्रश्नाचे उत्तर ' सगुण निर्गुण एक गोविंदू रे । ' असे देतात. अशाच स्वरूपाची अव्दैत भक्ती संत कबीराची आहे.

' जल में कुंभ, कुंभ में जल । बाहर भीतर पानी ।
फुटा कुंभजल जलहि समाना । यह तत कथौ गियानी ।। '

पाण्यात घडा आणि घडयाबाहेर पाणी आहे. घडा फुटल्यानंतर घडयातील पाणी बाहेरील पाण्याला मिळेल तसेच मानवाच्या मृत्यूनंतर त्याचीही माती होणार आहे. मग माती होण्याअगोदर जनसेवा का करू नये. जनसेवा हीच परमेश्वराची सेवा आहे. देव मानव यांच्यातील अव्दैत त्यातून दिसते.

' ना मै मंदिर, ना मै मस्जिद, ना कबी कैलाश में ।
कहे कबीर, सुनो भाई साधौ, सब सांसो की सांस में ।।

देव कुठे राहतो? मंदिर, मस्जिद, गुरूव्दारा, पर्वतावर राहत नसून संतजनामध्ये, सज्जनामध्ये, त्यांच्या श्वासामध्ये असतो. अशीच एकरूपता ज्ञानदेवांमध्ये दिसते. सर्वांमध्ये, चराचरामध्ये परमेश्वर भरलेला आहे तर वेदाभ्यास करण्याचा अधिकार ब्राम्हणांना आहे तो इतर वर्णियांना व आम्हाला का नाही असा प्रश्न त्यांनी निर्माण केला त्याचे उत्तर कुणालाही देता आले नव्हते. निवृत्तीनाथ व त्यांच्या भांवडांनी ब्रम्हचर्य पाळून हरिनाम घेत जन्माचे सार्थक करावे, वंश वाढवू नये अशी अट घातली. या अटीला न घाबरता अध्यात्मिक लोकशाहीच्या प्रस्थापणेसाठी भक्तिच्या क्षेत्रातील वर्णव्यवस्थेला आघात पोहचविला. ज्ञान, कर्म व भक्तिच्याव्दारे समाजसेवा केली. धर्मविषयक तत्वज्ञान, आचारधर्म यामध्ये जटिलता होती ती काढून अव्दैतवादी हरिहर ऐक्याची संजीवनी त्यांनी दिली. म्हणुनच कुंभार, सोनार, न्हावी, माळी, तेली, वाणी अशा अठरापगड जातींना ज्ञानेश्वर माऊली वाटतात. स्वतः प्रपंच न करणाऱ्या ज्ञानेश्वरांनी गृहस्थाश्रमाची कर्तव्य सांगितली. ' प्रपंच करावा नेटका ' अशी पुस्ती स्वामी रामदासानी जोडली.

ज्ञानेश्वरीमध्ये अध्यात्मासोबत वाङमयीन गोडी आहे. श्रीखंडामध्ये साखर, दही, केशर एकत्र येतात त्याचा सुगंध, चव काही औरच असते तसेच ज्ञानेश्वरीचा गोडवा आहे.

' अध्यात्मशास्त्रीं इये । अंतरंगचि अधिकारियें
परी लोक वाक्यातुर्य । होईल सुखिया '

अध्यात्मिक अध्यात्माचा आस्वाद घेतात व साहित्यिकही सौंदर्याची गोडी चाखतात. ज्ञानेश्वरीमध्ये उत्तुंग काव्यगुण असून श्रोत्याची स्थिती ज्ञानदेवांनी दिलेल्या उदाहरणाप्रमाणे होते.

' जैसा भ्रमर भेदी कोडे । भले तैसे काष्ट कोरडे
परि कळिके मांजी सांपडे । कोवळिये ।।
तेथ उत्तीर्ण होईल प्राणे । परि ते कमलदल चिरू नेणे
तैसे कठिण कोवळेपणे । स्नेह देखा ।।

कठिण लाकडाचा चुराडा करणारा भृंगा जसा कोवळया कमळामध्ये रात्रभर बंदिस्त राहतो तसेच ज्ञानेश्वरीचा आस्वादघेतांना श्रोत्यांची स्थिती होते. ज्ञानेश्वरीत नाद, लय, ओघ काव्यगुण आहेत. भाषाप्रभू ज्ञानदेव हे शब्दप्रभूही आहेत. ते संस्कृत तज्ञ व ज्ञानियाचा राजा आहेत.

चंद्र तेथे चंद्रिका। शंभु तेथे अंबिका
साधू तेथे विवेका। असणे की

अशी रसाळता जागोजागी असल्यामुळे "नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी, एकतरी ओवी अनुभवावी" हे नामदेवांचे प्रमाणपत्र सार्थ ठरते.

संत ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वामध्ये ज्ञान व भक्ती हा संयोग आहे. त्यांनी भक्तिला धर्म, अर्थ, काम, मोक्ष यामध्ये वरचे स्थान दिले आहे. भक्ती करतांना गर्व, संपत्ती, विद्वत्ता, शरीरभाव, अहंकार या बाबींचा त्याग करायला सांगीतले.

तरी बाहय आणि अंतरा। आपुलीया सर्व व्यापारा
मज व्यापकते विरा। विषो करी
आघवा आंग जैसा। वायु मिळोनी आहे आकाशा
तू सर्व कर्मी तैसा। मजसींचि अस

असे अद्वैत भक्तिमध्ये संपूर्ण प्राण ओतल्याशिवाय समाधान मिळणार नाही. भक्ती करतांना तुम्ही व्रत, नियम न करावे। शरीराने न पीडावे। दुरी केही न वचावे। तीर्थासी गा।। ' असा विचारही मांडला.

ज्ञानेश्वरीच्या शेवटी पासायदान असून त्यात मानवतावादाची प्रार्थना आहे. स्वतःला ज्ञानी समजणारा मानव जीवनापेक्षा पोथ्या, पुराण, धर्मग्रंथ यातील निर्जिव अक्षरांना प्रमाण मानतो त्याच्यातील वैगुण्ये निघावीत प्राणीमात्राची मैत्री घडावी. मानवासोबत प्राणीमात्र सुखी व्हावेत. स्वधर्मसूर्य प्रकाशमान व्हावा, जीवमात्राला स्वकर्तव्याचे भान यावे, दृष्टत्व नाहिसे व्हावे, सद्भावनेचा विकास व्हावा. दुर्जनाचा दृष्टभाव नाहिसा व्हावा, संतसंगती वाढावी, सदा सज्जन सोयरे व्हावेत अशा आशावादी मागण्या पूर्ण होत असल्यामुळे व ज्ञानदेवाचे ' विश्वचि माझे घर ' हे स्वप्न साकार होत असल्याने '--ज्ञानदेवो सुखिया झाला '.

***आधारग्रंथ–***

1) श्री ज्ञानेश्वरी – प्रकाशक – गोविंदभवन कार्यालय, गीताप्रेस, गोरखपूर –
2) लोकराज्य – श्री ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी विशेषांक – महाराष्ट्र शासन (16 नोव्हे 1990)